# रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग

## केंद्र कार्यालय अलिबाग

मु.हॉटेल निलीमा शेजारी, चेंढरे, ता.अलिबाग, पिन कोड- ४०२ २०१

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.अलिबाग बँकेत लिपिक या हुद्याची रिक्त पदे सरळसेवा भरती प्रक्रिया अंतर्गत ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी पात्र नामांकित, नोंदणीकृत व मान्यताप्राप्त व सरळसेवा भरती प्रकियेचा अनुभव असणा-या संस्था/एजन्सीकडून सविस्तर प्रस्ताव मागविण्यांत येत आहे. त्यानुसार प्रस्ताव बँकेच्या प्रशासन विभागाकडे दिनांक १८.०५.२०२२ रोजी सायं. ५ वा.पर्यंत स्विकारण्यांत येईल.

१. बँकेच्या जाहिरात प्रसिध्द करणेपासून ते बँकेत प्रत्यक्ष उमेदवाराची नेमणूक करणेपर्यंतची संपूर्ण कार्यवाही सदर भरती प्रक्रिया अंतर्गत ऑनलाईन पध्दतीने करावयाची आहे.
२. सदर संस्था/एजन्सी नाबार्ड/सहकार खाते यांनी सुचविलेल्या नियमांचे पालन करणारी असावी.
३. सदर संस्था एजन्सी ही नामांकित व पारदर्शी भरती प्रक्रिया राबविणा-या परंतु, भरतीसाठी Sub Contracting पध्दत अवलंबून Impanel करून भरती प्रकिया राबविणारी संस्था / एजन्सी नसावी.
४. सदर संस्था/एजन्सी यांना नोकर भरती प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्याचा अनुभव असावा.
५. सदर संस्था / एजन्सीकडे सरळसेवा परीक्षा राबविण्याची क्षमता (ऑनलाईन परीक्षा, आवश्यकतेनूसार हॉल उपलब्ध करणे, तिकीट इ.यंत्रणा) असावी, तसेच त्यासाठी त्यांचेकडे आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध असावे.
६. सदर संस्थेविरूध्द यापूर्वी कोणत्याही नोकरभरतीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारीच्या चौकशीमध्ये सदरची संस्था/एजन्सी परीक्षेसंबंधी गलथान व्यवस्थापन, भ्रष्टाचार, गुन्हेगारी पध्दतीचा हस्तक्षेप इ.बाबतीत, दोषी असल्याचे सिध्द झालेले नसावे किंवा सदर संस्था/एजन्सीला (नोकर भरतीच्या अनुषंगाने) काळ्या यादीत (Black List) समाविष्ट करण्याचे प्रस्तावित किंवा केलेले नसावे.
७. सदर संस्था/एजन्सीकडे जिल्हा बँकेत नोकर भरती प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने व सक्षमपणे, कार्यक्षमतेने राबविण्यासाठी आवश्यक असणा-या सुविधा असणे आवश्यक आहे.
८. वरील अटी शर्तींची पूर्तता करणा-या संस्थांनीच प्रती प्रशिक्षणार्थी परीक्षा शुल्कासह सविस्तर प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करावेत. (स्वतंत्र लिफाफा रजिस्टर पोष्टाद्वारे)

## -: आवश्यक कागदपत्रे व माहिती :-

१. संस्थेबद्दलची माहिती, इन्कमटॅक्स व जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र, आयकर रिटर्न दाखल केल्याचा पुरावा, जीएसटी क्रमांक इ.

२. ऑनलाईन पध्दतीने भरती प्रक्रिया राबविणेबाबतच्या अनुभवासह कागदपत्रे.

३. नियोजित भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक कालावधी (नियोजित भरती प्रक्रिया कार्यक्रम)

४. ऑनलाईन भरती प्रक्रिया राबविण्याची क्षमता (जास्तीत जास्त किती परिक्षार्थींची प्रक्रिया राबविणेची क्षमता आहे, हे स्पष्ट करावे).

५. परीक्षा केंद्राची व्यवस्था, परीक्षा किती टप्प्यात पार पाडणार, नियोजित भरती प्रक्रियेची कार्यपध्दती व परीक्षा शुल्क.

६. बँकेने संमत केलेल्या करार नमुन्यात करार करण्यास तयार आहात का.

७. संस्था/एजन्सीची निवड झाल्यानंतर संबंधित संस्था / एजन्सीला याबाबत कळविण्यांत येईल, इतर संस्था/एजन्सी सोबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८. वरील अटी व शर्तीमध्ये वाढ/कमी/दुरूस्ती करण्याचा अथवा सदर प्रक्रिया संपूर्ण रद्द करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

९. संस्था/एजंसीचा प्रस्ताव स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार बँकेच्या मा.संचालक मंडळास राहील.

१०. स्वतंत्र दोन्ही लिफाफे (Technical & Commercial) रजिस्टर पोष्टाद्वारेच स्विकारले जाईल.

दिनांक ११.०५.२०२२

उपमुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा मध्य.सह.बँक लि.अलिबाग